**कृपया प्रसिध्दीसाठी** **19 एप्रिल 2009**

## श्री. राम नाईक व श्री. संजय निरुपम यांच्या उपस्थितीत श्री. हेमेंद्र महेता यांनी घातला गोंधळ

**मुंबई, रविवार:** उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील तीन प्रमुख उमेदवार श्री. राम नाईक, श्री. संजय निरुपम व श्री. शिरिष पारकर यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते माजी आमदार श्री. हेमेंद्र महेता यांनी घातलेल्या अभूतपूर्व गोंधळामुळे अखेर ही सभा विसर्जित करण्याची वेळ आली.

इन्स्पायर्ड भारत ॲक्शन फोरम आणि अन्य २४ संघटनांच्या वतीने आज बोरीवलीतील गोपाळजी हेमराज हायस्कूल मध्ये झालेल्या सभेचे राष्ट्रवादीचे नेते श्री. हेमेंद्र महेता यांनी गोंधळात रुपांतर केल्याने नागरिकांच्यात सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. श्री. दत्ताराम कोसंबे यांच्या अध्यक्षतेखाली इन्स्पायर्ड भारत ॲक्शन फोरमने **'उमेदवारांचा परिचय'** असा कार्यक्रम आखला होता. सदर कार्यक्रमामध्ये भाजपा-शिवसेनेचे उमेदवार श्री. राम नाईक, कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस व रिपब्लिकन चे उमेदवार श्री. संजय निरुपम आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार श्री. शिरिष पारकर यांनी भाग घेतला. आयोजकांनी सभेचे प्रारुप ठरवून ते अगोदरच सर्वांना देण्यात आले होते. सुरुवातीला श्री. कोसंबे सर्वांचे स्वागत करणार, त्यानंतर तीघेही उमेदवार आपापला वचननामा जाहीर करतील, त्यानंतर उमेदवारांना कार्यक्रमांअगोदर ज्या महत्वाच्या मागण्या लेखी दिल्या आहेत त्यावर उमेदवारांचे मतप्रदर्शन, शेवटी ज्या नागरिकांनी कार्यक्रम सुरु होण्याअगोदर लेखी प्रश्न दिले आहेत त्यांच्या प्रश्नांना उत्तरे आणि अखेरीस इतिवृत्त वाचन, आभार प्रदर्शन आदी कार्यक्रमाचे स्वरुप आधीच कार्यक्रम पत्रिकेद्वारे देण्यात आले होते.

कार्यक्रम पत्रिकेनुसार सभा सुरुळीत चालु होती. तीनही उमेदवारांनी वचननामे जाहीर केले, संयोजकांनी मांडलेल्या मागण्यावर मतप्रदर्शन केले. आयोजकांनी प्रश्नोत्तरे सुरु करण्याच्या वेळेला बोरीवलीचे माजी आमदार श्री. हेमेंद्र महेता यांनी अचानक उभे राहून गोंधळ घालायला सुरुवात केली. "मला प्रश्न विचारायचे आहेत, आधी मला प्रश्न विचारु द्या" असा गलका करण्यास श्री. मेहता यांनी सुरुवात केली. त्यावर आयोजक इन्स्पायर्ड भारत ॲक्शन फोरम चे अध्यक्ष श्री. कोसंबे यांनी " आपण अगोदर सुचना दिली असती तरच आम्ही नियमाप्रमाणे बोलू देऊ शकलो असतो, परंतु आपण तसे केलेले नाही. ज्यांनी प्रश्नांची पूर्वसूचना दिली आहे त्यांचे प्रश्न अगोदर घेण्यात येतील, त्यामुळे आम्ही आपल्याला बोलायला देऊ शकत नाही" असे सांगितले. त्यावर संतप्त झालेल्या श्री. हेमेंद्र महेता यांनी सभेमध्ये आरडाओरडा करावयास सुरुवात केली. त्यांच्याबरोबर आलेल्या काही जणांनीही त्यात भर घातली. मात्र आयोजकांनीच अतिशय खंबीरपणे नियम मोडायला नकार दिला. तरीही श्री. हेमेद्र महेता यांनी गोंधळ सुरुच ठेवला. अखेर आयोजकांनी लोकशाही विरोधत हे वागणे असल्याने सभा बरखास्त केली.

तीन महत्वाचे उमेदवार एकत्र आल्यामुळे त्यांची ध्येयधोरणे जाणून घेऊन मतदान करण्याची नागरिकांना मिळत असलेली चांगली संधी श्री. हेमेंद्र महेता हे आततायीपणाने वागल्यामुळे वाया गेली. यामुळे नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया उमटलेली दिसत होती.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**